# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. हेमा दिनानी

---

मी संगीत मी स्वानंद
मी आरोह मी अवरोह
मी आकार मी अलंकार
मी वादी मी संवादी
मी स्वर मी राग
मी मुखडा मी अंतरा
मी ध्रुवपद मी ताल
मी वाद्य मी वृंद
मी तीव्र मी  कोमल
मी मंद्र मी सरल
मी लय मी नृत्य
मी तार मी तराना
मी रस मी भाव
मी नाद मी ब्रह्म
मी ओमकार मी आकार
मी प्रेम मी प्रार्थना
मी श्रद्धा मी विश्वास
मी कृती मी स्मृति
मी सुंदर मी श्याम
मी नट मी नटराज
मी श्वास सर्वांत
मी संगीत सर्वांचाच
मी स्वानंद सर्वांचाच

Anahat Music Therapy